REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# तुकडोजींचा आर्थिक विचार


डॉ. दत्तात्रय बाजीराव वाटमोडे
शरद्चंद्र महाविद्यालय, बुटीबोरी

## प्रस्तावना :

30एप्रिल 1909 च्या पहाटे अमरावती जिल्ह्यातील अत्यंत मागासलेल्या 'यावली' या गावात तुकडोजी महाराज यांचा जन्म झाला. त्यांच्या घरात अत्यंत गरिबी होती. अशा विपरित परिस्थितीतही एका सामान्य मुलापासून तर 'राष्ट्रसंता'पर्यंतचा पल्ला त्यांनी गाठला; ही गोष्ट वाखानण्याजोगीच आहे. 'माणिक' हे महाराजांचे त्यांच्या माता–पित्यानी ठेवलेले नाव, महाराजांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने सार्थक ठरवले. महाराष्ट्रीय इतर संतांच्या तुलनेत तुकडोजींचे 'समकालीन समाजाचे भान' हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खास वैशिष्ट्य सांगता येते. तुकडोजींच्या सर्वांगीन कार्याचा हाच पाया होता. त्यांना समर्थ आणि सुखी असा भारतीय समाज अपेक्षित होता. त्याकरिताच महाराजांनी आपले सर्व आयुष्य वेचले. त्याकरिता वाटेल तेवढ्या खस्ता खालल्यात. डॉ. रा. शं. ठोसर म्हणतात, "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि गाडगे महाराज यांचे निर्मळ आणि निर्व्याज प्रेम लोककल्याणाच्या कळवळ्यामध्ये एकरूप झालेले होते."[1] हे सत्य आहे. या दोन्ही संतांनी देशातील अज्ञानाचा, दु:खाचा अंधकार नष्ट केला. या आधुनिक काळातील दोन संतांनी महाराष्ट्राला विकासाची नवदृष्टी बहाल केली.

तुकडोजींचे विचार किती समयोचित होते, हे आपल्याला त्यांच्या 'ग्रामगीता' या ग्रंथाच्या अध्ययनातून कळते. तुकडोजींना समाजाचा सर्वांगीन विकास अभिप्रेत असला तरी तो अध्यात्मशक्तीच्या पायावरच झाला पाहिजे; हा त्यांचा आग्रह होता. महाराजांच्या विचाराने, अध्यात्म हे माणसाने केलेले कोणतेही कार्य विकारविरहित ठेवते. त्यामुळे ते कार्य मानवजातीचे कधीही आणि कोणतेही अहित करीत नाही तर उलट सकल मानव जातीच्या कल्याणाचेच ते व्रत ठरते. तुकडोजींचे धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक विचार याच विशुद्ध मार्गाने अवतरले आहेत. अध्यात्मक्षेत्रात कार्य करणारे तुकडोजी असले तरी ते मानायचे की, जोपर्यंत मानवाचा लौकिक विकास होत नाही तोपर्यंत तो पारमार्थिक विकासाकरिता समर्थ होत नाही. म्हणून तुकडोजी **'सुज्ञांनो, हाच तुमचा खरा धर्म!'** या लेखात सांगतात, "समाजाचा आर्थिक पाया सुधारणे हे सर्वांत महत्त्वाचे व पहिले कार्य होय. या अर्थक्रांतीच्याच दृष्टीने भूमिदानयज्ञाला आज आम्ही अग्रस्थान देतो. लोकांना लंगोट्या लावून रामनाम जपायला जरसांगायचे नसेल तर त्यांच्या जीवनात अर्थविकास पहिल्यांदा घडवून आणला पाहिजे."[2] लौकिक विकासाचा एवढा स्पष्ट आणि उचित विचार खचितच कोणत्या संताने केला असेल.

## श्रमप्रतिष्ठा विकासाचा पाया :–



आपल्या समाजात श्रमाला प्रतिष्ठा नाही, हेच आपल्या आर्थिक अवनतीचे मूळ आहे, हे तुकडोजींनी बरोबर हेरले होते.कोणत्याही समाजाची उन्नती श्रमप्रतिष्ठेतूनच होत असते. समाजात श्रमाला प्रतिष्ठा असेल तर तो समाजाच्या समोर आदर्श असतो. त्यामुळे समकालीन जनता आणि भविष्यातील पिढी त्या दिशेने मार्गक्रमण करते कारण तोच त्यांचा आदर्श असतो. मात्र समाजात ऐतखाऊ लोकांना प्रतिष्ठा मिळत असेल तर पुढची पिढी तशीच घडते. महाराज स्पष्टच सांगतात, "ज्या राष्ट्रातील व्यक्ती आपल्या शक्तीचा पुरेपुर उपयोग करतात तेच राष्ट्र वैभवशाली राहू शकते"[3] अर्थतज्ज्ञांच्या मते, कोणत्याही

देशाची उन्नती त्या देशातील प्रतिभावंत नागरिकांवर अवलंबून असते. प्रत्येक देशआपल्या इथल्या लहान मुलांच्या विकासाकरिता देशातील संसाधनेखर्च करतात. त्यामागे त्यांचा हेतू असतो की, ही मुले मोठी आणि कर्तृत्ववान झाल्यानंतर ती देशविकासाच्या कामी येईल, देशाचे पांग फेडतील. या अर्थाने देशाची खरी संपत्ती ही त्या देशाचे नागरिक आहेत. तुकडोजींचा आर्थिकविचार अत्यंत आधुनिक व कालसापेक्ष होता. म्हणून महाराज मानायचे की, आपल्या देशाची संपत्ती तिजोरीतील नोटा, सोने व चांदी, हिरे, बंगले इत्यादी नसून देशातील श्रमिक आहेत. **'ग्रामगीते'** तुकडोजी सांगतात–

"खोदून आणली गोटे माती । तासली फाडी, रचल्या भिंती ।
तेव्हाच बनली ती संपत्ति । परिश्रमाच्या स्पर्शाने ।।"[4]

जगातील अमेरिका, रशिया, जापान यांसारख्या राष्ट्रांनी विकासाचा जो उच्चांक गाठला तो त्या देशातील अविश्रांत कष्ट करणाऱ्या नागरिकांमुळे, हे तुकडोजींनी विदेशवारीच्या वेळेस अगदी जवळून अनुभवले होते. तुकडोजींच्या विचाराने देशाकरिता श्रम करणाऱ्या लोकांचे स्थान श्रेष्ठ असायला हवेत; पण आपल्या देशात ते होत नाही, याचे महाराजांना अतीव दुःख होते. देशात निर्माण होणाऱ्या संपत्तीवर श्रमिकांचा पहिला अधिकार असतो, हे तुकडोजींचे मत होते.

## आर्थिक विषमता : कलंक :–

आपल्या देशातील संपत्तीची विभागणी विषमतेच्या तत्त्वावर झाली आहे; हे तुकडोजींचे स्पष्ट मत होते. त्यामुळे आपल्या समाजात अनेक समस्या निर्माण झाल्यात आणि या समस्यांमुळे आज आपला देश पोखरल्या जात आहे.देशातील श्रीमंत, उद्योगपती स्वार्थाने प्रेरित होऊन श्रमिकांना–कष्टकऱ्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला देत नसतील व श्रमिकांच्या प्राथमिक गरजाही पूर्ण होत नसतील तर तो राष्ट्रद्रोह मानला पाहिजे, असे महाराजांचे स्पष्ट मत होते. आध्यात्मिकतेच्या पायावर उभारल्या गेलेल्या आपल्या देशात विषमतेला कोठेही स्थान नाही. मात्र आपले तत्त्वज्ञान आणि आपले आचरन यात फरकआहे, ही तफावत त्यांनी अनुभवली होती. म्हणून ती तफावत नष्ट करण्याचा विचार महाराज करतात. कामगार राष्ट्रीय संपत्तीचे निर्माते असल्याने देशाच्या संपत्तीवर त्यांचा अधिकार पहिला आहे.

तुकडोजींनी उत्पादनाच्या साधनांचा सूक्ष्म व वास्तवादी विचार केला होता. त्यामुळे 'गरिबी ही मागच्या जन्माच्या पापाचे फळ आहे', हे मत त्यांना अजिबात मान्य नव्हते. आर्थिक विषमता ही सामाजिक अस्तित्वाकरिता मारक असल्याने, ती त्वरित नष्ट करण्याचा विचार महाराज व्यक्त करतात. आपल्या देशातील श्रम करणारा प्रत्येक घटक हा सुखात नांदला पाहिले; ही तुकडोजींची रास्त अपेक्षा होती.

## आर्थिक विकासाचा मंत्र : उद्योगशीलता :–

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने तुकडोजीं शेतीचा विचार पहिल्यांदा करतात. मानवाच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्याचे सामर्थ्य शेतीत असल्याने आणि देशाच्या विकासात शेतीचा वाटा महत्त्वाचा असल्याने महाराज शेतीला अग्रस्थान देतात खरे; मात्र त्याचवेळेस ते कालसापेक्ष विचार करतात व औद्योगीकरणाचा पुरस्कार करतात. त्यातूनच तुकडोजी राष्ट्रविकासाची त्रिसूत्री स्पष्ट करतात, "शेतात खपून खंडोगणती धान्य उत्पादन करावे लागते. कारखान्यात कष्ट उपसून जीवनावश्यक वस्तू आणि शस्त्रास्त्रांचे ढीग निर्माण करावे लगतील"[5]तुकडोजींनी उद्योगाचा संबंध सामुहिक कर्तृत्त्वाशी जोडला होता. महाराजांनी भारताच्या गुलामीचा तसाच स्वातंत्र्याचा काळ अगदी जवळून पाहिला होता. या काळात कष्ट न करणाऱ्या लोकांचे प्रमाण फार होते. राष्ट्रसंतांच्या मते, या दोन्ही काळांत कष्ट न करता मौज करणारे नागरिक आपल्याला परवडणार नाहीत. या देशातल्या श्रमिकांपासून तर श्रीमंतापर्यंत प्रत्येकाने श्रमकरून वस्तूंची निर्मिती केलीच पाहिजे. तुकडोजींना देशविकासाचा ध्यास लागला होता. म्हणून ते सांगायचे की, उद्योगांमुळे आपल्याला कोणतीही असाध्य गोष्ट साध्य करता येते. तुकडोजींच्या विचाराची नाळ नेहमीच मातीशी जुळली असायची म्हणून ते उद्योगाचा विचार करताना शेतीवर आधारित उद्योगांचेच महत्त्व विशद करतात. शेतीतून उत्पादन केलेल्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारल्यास शेतकऱ्यांचा फायदा होईल व देशात रोजगारही निर्माण होईल, हा त्यांचा विचार होता.

तुकडोजी, स्त्री–पुरुषांना संसाररूपी रथाचे दोन चाके मानतात व या दोन्ही घटकांचे समान महत्त्व सांगतात. भारतीय पुरुषप्रधान समाजाने विकासप्रक्रियेपासून स्त्रियांना दूर ठेवल्याने आपले फार मोठे नुकसान झाले, असे महाराजांचे मत होते. याच कारणास्तव ते महिलांचे विकासकार्यात योगदान अपेक्षितात आणि महिलांनी आर्थिक विकासात आपला वाटा उचलावा, असे त्यांना आवाहन करतात.

## आर्थिक संपन्नतेचे साधन : कला :–

तुकडोजी महाराज मानवी जीवनात कलेचे अनन्यसाधारन महत्त्व मानत होते. त्यांच्या विचाराने संपूर्ण मानवी जीवनाला कलेने व्यापले आहे. म्हणून मानवाचे जीवन उन्नत व संपन्न करायचे असेल तर प्रत्येकाच्या अंगी कोणतीतरी कला असलीच पाहिजे. तेव्हाच तो आपले पोट भरू शकेल. अन्यथा त्याला उपाशी राहावे लागेल. राष्ट्राच्या संपन्नतेत कलेचे महत्त्व ओळखूनच तुकडोजींनी आपल्या 'ग्रामगीता' या अभंग कलाकृतीमध्ये 'ग्रामनिर्माणकला' व 'जीवन–कला' हे दोन अध्याय खर्ची घातले आहेत. **'जीवनकला'** या अध्यायात तुकडोजी म्हणतात–

"सर्वांशी सर्वांचा सहकार । हाचि आहे मार्ग थोर ।
गावी ये स्वर्गीयता सुंदर । याच कलेने निश्चयेसि ।।
ही मानव्याची जीवनकला । गावी शिकवा सर्वाला ।
मग उणे न पडे कोणाला । कधी काही ।।"[6]

आपल्या आर्थिक अवनतीची कारणीमीमांसा करताना महाराज म्हणतात, श्रमातून राष्ट्राचा, समाजाचा व विश्वाचा विकास होतो आणि आळस व चंगळवाद माणसाला अधोगतीला नेतो. आपली आर्थिक अवस्था अत्यंत हलाखीची असताना आपण रूढ्या व प्रथांच्या नावाखाली फार मोठी उधळपट्टी करतो. मग आपल्यामध्ये दुसऱ्यांच्या श्रमावर जगण्याचे प्रमाण वाढते. महाराजांच्या मते, दुसऱ्यांच्या भरोश्यावर पोट भरणारा व्यक्ती हा माणूस म्हणण्याच्या पात्रतेचा नसतो. प्रत्येकाने स्वावलंबी जीवन जगले पाहिजे व त्याकरिता प्रत्येकाने कलेची उपासना करणे अगत्याचे आहे.

## भारताच्या आर्थिक विकासाचा कणा : शेती :–

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व तुकडोजींनी ओळखले होते. ते सांगायचे, आपल्या देशात शेतीवर उपजीविका करणाऱ्या लोकांचे प्रमाण फार मोठे आहे. त्यामुळे आपल्याला आर्थिक विकास करताना शेतिकेंद्रित योजना आखाव्या लागतील. महाराजांच्या काळात भारतीय शेतीमध्ये सुधारणा होत असल्यात तरी त्या अपूर्ण होत्या. त्यामुळे आपल्या शेतीच्या विकासात फार वाव आहे, हे तुकडोजींना ठाऊक होते. एक तर आपल्या देशाची मोठी लोकसंख्या व त्यात दिवसेंदिवस होत असलेली वाढ आणि आपल्या वाट्याला असलेली मर्यादित जमीन या सगळ्या गोष्टींचा ताळमेळ बसविल्याशिवाय आपल्याला आर्थिक उन्नती साधता येणार नाही, याबाबत महाराज स्पष्ट होते. म्हणून तुकडोजी म्हणतात, आपण आपली जमीन जास्तीत जास्त उत्पन्नाकरिता व कमीत कमी जमीन निवासाकरिता वापरायला हवी. तसेच कोणतीही जमीन पडित ठेवणे आपल्याला परवडणारे नाही, हेही ते स्पष्ट करतात. याच कारणास्तव श्रीमंताना देशाचा विचार करून कमी जागेत घरे बांधण्याचा सल्ला महाराज देतात.

## मर्यादित यांत्रिकीकरणावर भर :–

तुकडोजींनी त्या काळाच्या पार्श्वभूमीवर मर्यादित यांत्रिकीकरणाचा पुरस्कार केला होता. महाराजांच्या या विचारामागे भारतीय जीवनशैलीचे सूक्ष्म आकलन होते. भारतासारख्या अमाप लोकसंख्या असलेल्या देशात यंत्रांचा जास्त वापर करणे धोक्याचे ठरणार आहे, हे त्यांना माहीत होते. यांत्रिकीकरणामुळे आपल्याकडे असलेले रोजगार कमी होतील. त्यामुळे एकतर आपल्या देशात बेरोजगारीची समस्या उद्भवेल आणि दुसरे म्हणजे यांत्रिकीकरणातून निर्माण झालेल्या संपत्तीचा संचय श्रीमंताकडेझाल्याने आपल्या समाजात आर्थिक विषमता वाढीस लागेल. महाराजांच्या मते उद्योगधंदे हे स्वविकासाकरिता नसून राष्ट्रविकासाकरिता असतात, हे आपण विसरू नयेत. मात्र यंत्रसंस्कृतीत भांडवलदारीला चालना मिळते आणि भांडवलदारी अर्थव्यवस्थेत श्रमिकांचे मोठ्या प्रमाणात शोषण

होत असते. देशाला समृद्धीच्या पथावर अग्रेसर करणाऱ्या श्रमिकांचे, शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे शोषण तुकडोजींना अजिबात मान्य नव्हते. आर्थिक उन्नतीने जनआंदोलनाचे स्वरूप धारण केले तरच आपला देश संपन्न होईल, हे तुकडोजी मानायचे. म्हणून हे म्हणतात, "प्रत्येकाला देशाच्या यंत्रातला एक पूर्जा म्हणून काम करावयाचे आहे. मग तो नोकर असो, किसान असो वा गिरणीचा मालक, मॅनेजर असो. सर्वांना जगावयाचे आहे व जनमनाला जागवावयचे आहे."[7]तुकडोजींचा हा संदेश त्यांच्या आधुनिक विचाराची साक्ष आहे.

## स्वदेशीचा पुरस्कार :–

आपल्या देशातील अनेक विचारवंतांनी, राष्ट्रीय स्वाभिमान जागवायच्या दृष्टीने स्वदेशीचा पुरस्कार केला आहे. तुकडोजी तर स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय होते. त्यांनी महात्मा गांधींसोबत अनेक चळचळीत सहभाग घेतला होता. त्या काळात सर्वच स्थरांतून स्वदेशी वस्तूंचा पुरस्कार व परकीय वस्तूंची होळी केल्या जात होती. त्यामागे एक तत्त्वज्ञान होते की, आपल्या नागरिकांना स्वाभिमानाने जगवावयाचे असेल तर त्यांनी इतर सामर्थ्यांप्रमाणे आपले आर्थिक सामर्थ्य सदोदित विकसित करीत राहिले पाहिजे. तसेच आपल्या सोबतच आपल्या देशातील इतर श्रमिकांचाही विचार केला पाहिजे. तुकडोजींचा आर्थिक विचार दुहेरी स्वरूपाचा होता. एक तर आपल्या देशात संपत्तीची निर्मिती करणे व दुसरीकडे आपली संपत्ती दुसऱ्या देशात जाणार नाही याची काळजी वाहणे. तुकडोजी **'स्वातंत्र्याच्या सुखसोहळ्याजी सफलता केव्हा?'** या लेखात म्हणतात, "ग्रामीण कलाकार बेकार बनून उपवासाने मरत आहेत आणि देशातील संपत्तीचा प्रवाह वेगवेगळ्या रूपांनी अजूनही परदेशात तसाच जात आहे"[8]तुकडोजी महाराज सांगायचे की, स्वदेशी वस्तूंचा वापर प्रत्येक नागरिकाने केला पाहिजे, हे आपले राष्ट्रीय कर्तव्य व आर्थिक समृद्धीचा महामंत्र आहे. या मंत्राचा जप प्रत्येक नागरिकाने प्रत्येक काळात करायला हवा.

तुकडोजींचा आर्थिक विचार भारताच्या सामर्थ्याचा होता. महाराजांनी केलेला आर्थिक विचार त्यांच्या भारतीय जीवन दर्शनाच्या सखोल व अखंड चिंतनातून जन्माला आला असल्याने तो स्वयंपूर्ण आहे. त्यांनी देशाचा आर्थिक विचार करताना प्रत्येक घटकांचा जीवन चरितार्थाचा व स्वयंपूर्णतेचा विचार केला होता. म्हणून तुकडोजींचा आर्थिक विचार राष्ट्रीय असून तो परिपूर्ण आहे. सार्वत्रीकता हा महाराजांच्या आर्थिक विचाराचा पाया आहे.

## निकर्ष :

1) तुकडोजींना भारताच्या सर्वांगीन विकासाचा ध्यास लागला होता. तो त्यांचा ध्यासच त्यांच्या अर्थिक विचारात प्रतिबिंबित झाला आहे.
2) तुकडोजींचा विचार आध्यात्मिक तत्त्वावर आधारलाआहे. त्यामुळे ते तत्त्व त्यांच्या आर्थिक विचारात खेळताना दिसते.
3) तुकडोजींनी भारतीय समाजात श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केलेत.
4) तुकडोजी आर्थिक विषमतेच्या विरुद्ध होते म्हणून त्यांनी आर्थिक समानतेचा विचार मांडला आहे.
5) राष्ट्रसंत राष्ट्रविकासाच्या दृष्टीने 'जीवनाकरिता कला' या तत्त्वाचा पुरस्कार करतात.
6) तुकडोजींनी आर्थिक विचारात शेती व औद्योगीकरण यांचे संतुलन साधले आहे.
7) तुकडोजी स्वदेशीचे कट्टर पुरस्कर्ते होते.

## संदर्भ :

1) राष्ट्रसंत जीवन–गीतामृत, डॉ. रा. शं. ठोसर, डॉ. वत्सलाताई ठोसर प्रकाशन, मोझरी, 1999, द्वितीय आवृत्ती, पृ. क्र. 89
2) राष्ट्रसंत समग्र गद्य वाड्.मय, खंड–9, सं. प्रा. रघुनाथ कडवे, श्रीगुरुदेव प्रकाशन, मोझरी,2002, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. 46
3) राष्ट्रसंत समग्र गद्य वाड्.मय, खंड–3, सं. प्रा. रघुनाथ कडवे, श्रीगुरुदेव प्रकाशन, मोझरी,2000, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. 80
4) ग्रामगीता, सं. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, 1999, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. 190

5) राष्ट्रसंतांची भाषणे, सं. बाबा माहोड, श्रीगुरुदेव प्रकाशन मोझरी, 1997, तिसरी आवृत्ती, पृ. क्र. 22
6) ग्रामगीता, सं. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, 1999, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. 402
7) राष्ट्रसंतांची पत्रे, सं. बाबा माहोड, श्रीगुरुदेव प्रकाशन मोझरी, 1998, चौथी आवृत्ती, पृ. क्र. 32
8) राष्ट्रसंत समग्र गद्य वाड्.मय, खंड–7, सं. प्रा. रघुनाथ कडवे, श्रीगुरुदेव प्रकाशन, मोझरी,2002, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. 66

LBP PUBLICATION